अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । सोमवार, दि. १३ मे २०२४ । वर्ष : २२ वे | अंक : २२३ वा | किंमत : ५ रुपये | पाने १२

# जिल्ह्याला अवकाळीचा फटका

सुराज्य/सोलापूर (ठिकठिकाणच्या वार्ताहरांकडून)

सोलापूर शहरासह जिल्ह्यात आज आवकाळी पावसाने थैमान घातले. वादळी वाऱ्याने अनेक ठिकाणी घरांचे आणि दुकानांवरील पत्रे उडून गेले. सुदैवाने जीवित हानी झाल्याचे वृत्त नसले तरी फळबागांचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. सुमारे दीड ते दोन तास झालेल्या पावसाने रस्त्याना अक्षरश: पाटाचे स्वरूप आले होते. दरम्यान अक्कलकोटहून आले वृत्तानुसार वीज पडून दोन तर गोठ्याचा पत्रा पडून एक जनावर दगावले. तर लऊळ येथे शॉपिंग सेंटरचे पत्रे उडाल्याने लक्षावधी रुपयांचे सामान भीजून नुकसान झाले. तर माढा तालुक्यात केळीच्या बागा उन्मळून पडल्या.



## अक्कलकोटला तीन जनावरे दगावली



वीज पडून तीन जनावरे दगावली व वाऱ्याने शेड पडून एक गाय मृत्युमुखी पडले. तालुक्यातील जेऊर येथे वीज पडून महादेव फुलारी यांचे एक बैल मृत्युमुखी पडला. भोसगे येथील विशाल सगर यांचे वीज पडून एक म्हैस मृत्युमुखी पडली. चिक्केहळ्ळी येथे वाऱ्याने शेड पडून एक गाय मृत्युमुखी पडली. गौडगांव (बु) येथे एक बैल वीज पडून मृत्युमुखी पडला. असे तहसीलदारानी सांगितले

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यात मागच्या एप्रिल महिन्यात अवकाळी पावसाने आठवडाभर वादळी वाऱ्यासह धुमाकूळ घातला होता. रविवारी पुन्हा तालुक्यात मे महिन्याच्या तीव्र उन्हाळ्यात दमदार अवकाळी पाऊस होत आहे.शनिवार दि ११ मे पासुन तालुक्यात पुन्हा भाग बदलून-बदलून वादळी वाऱ्यासह पाऊस होत आहे. अक्कलकोट शहर व तालुक्यात रविवारी दुपारी तीन वाजल्यापासुन अवकाळी पावसाने सुमारे तासभर जोरदार हजेरी लावली. रविवारी सकाळपासुनच ढगाळ वातावरण होते. दिवसभर उन्ह नव्हते. तीन वाजण्याच्या सुमारास अंधारून आले व जोरदार पावसाला सुरूवात झाली. पावसाचा जोर चांगलाच होता.

श्री स्वामी समर्थ मंदिरासमोरून गटारीचे पाणी रस्त्यावर जोरात वाहत होते. भाविकांनी दुकानासमोर सोडलेली पादत्राणे पावसाच्या पाण्यात वाहुन गेली. या मंदिराच्या समोरुन वाहणाऱ्या गटारीच्या पाण्यातुनच भाविकाना मार्गक्रमण करावे लागले. फत्तेसिंह चौकापासुनचे सगळे गटारीचे पाणी खाली वाहत येऊन मुरलीधर मंदिराच्या समोर श्री स्वामी मंदिराच्या बाजुने खाली वाहत गेले. या वाहत्या गटारीच्या घाण पाण्यातुनच मार्गक्रमण करत भाविकांना जावे लागले. अचानक पाऊस आल्याने भाविकांची व नागरिकांची धावपळ झाली. उकाड्याने त्रस्थ झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. मंदिराच्या समोरील गेटच्या दोन्ही बाजुची गटारे भरून वाहत होती. गळी घाण व कचरा रस्त्यावर आला. मंदिराच्या आजुबाजुचे गटार धोकादायक बनले आहेत.नगरपरिषदेने पावसाळ्यापुर्वी उपाययोजना केले पाहिजे अशी मागणी होत आहे.

मैंदर्गी भागात वाऱ्याचा वेग अधिक असल्याने अनेक लोकांच्या घरावरील पत्रे उडाल्याचे सांगण्यात आले.तालुक्यात तीव्र उन्हाळ्यात



अवकाळी पाऊस पडत असल्याने सर्व सामान्य माणूस व बळीराजा मात्र सुखावला गेला आहे. या अवकाळी पावसाने ग्रामीण भागातील शेतशिवारात सर्वत्र पाणीच-पाणी दिसत होता.या पावसामुळे वातावरणातील तापमान मात्र पुरती घटली गेली होती. हवामान विभागाकडून वर्तवण्यात आलेल्या अंदाज प्रमाणे तालुक्यात पाऊस पडत असल्याने शेतकरी सध्या तरी आनंद व्यक्त करताना दिसून येत आहे.मागच्या महिन्यात देखील अक्कलकोट शहर आणि परिसरात चांगला पाऊस झाला होता. आज पुन्हा दुपारी एक वाजल्यापासून तालुक्यात अवकाळी पाऊस पडत आहे. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. उष्णतेच्या लाटेने होरपळणारा सामान्य माणूस मात्र आज या गारव्यामुळे सुखावला गेला आहे.यंदा भर उन्हाळ्यातच पावसाळा सुरु झाल्याचे अनुभव तालुकावासिय घेताना दिसतात. दुपारपासूनच तालुक्यात विजांचा कडकडाट सुरु होता. यामुळे अक्कलकोट तालुक्यातील बहुसंख्य गावात बत्ती गुल झाल्याचे सांगण्यात आले.तर तालुक्यातील काही भागात महावितरण कडून मेंटेनन्स चे काम सुरु असल्याने सकाळपासूनच महावितरण कार्यालयाकडून वीज खंडीत करण्यात आला होता. अक्कलकोट तालुक्यात मैंदर्गी, जेऊर, कर्जाळ, हंजगी, अक्कलकोट स्टेशन, बणजगोळ, शिरवळ, वागदरी, सलगर, कोन्हाळी, अक्कलकोट स्टेशनसह या भागासह तालुक्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. खरीपपूर्व शेतीच्या मशागतीसाठी, खोडवा उसासाठी व फळबाग तसेच भाजीपाला पिकासाठी हा पाऊस उपयुक्त असल्याचे शेतकर्यामधून बोलले जात आहे. आज तालुक्यात बहुतांश भागात दमदार पाऊस झाल्याने शेतकर्यामधून समाधान व्यक्त होत आहे.

## लऊळला शॉपिंग सेंटरचे पत्रे उडाले

### लाखो रूपयांचे नुकसान



कुर्डुवाडी : लऊळ (ता.माढा) येथील शनिवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे एसटी स्टँड नजीक शॉपींग सेंटरचे पत्रे उडाल्याने कृषी केंद्रातील खते व इतर साहित्य भिडल्याने लाखो रूपयांचे नुकसान झाले.

लऊळ येथील वैभव मनोज कदम यांच्या शेतकरी कृषी सेवा केंद्रासह श्री चरण फूट वेअरच्या दुकानावरील सर्वच पत्रे,अँगल उडून गेले असून दुकानात असलेल्या शेतीमालासह विविध चप्पलांचेही नुकसान झाल्याने आठ लाखांचे तर याच रस्त्यावर असलेल्या कुलदीप गजेंद्र गवळी यांच्या रस्त्यालगत असलेल्या सात गाळ्यांवरील पत्रे,अँगल, व त्यावरील कुंभ वादळी वाऱ्यात पडल्याने व उडून गेल्याने सुमारे सात लाख रुपयांचे असे एकूण पंधरा लाखांचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे.रविवारी दिवसभर महसूल विभागाकडील तलाठी,मंडलाधिकाऱ्याकडून या घटनेचा पंचनामा केला गेला नाही. यामुळे ग्रामस्थांतून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. त्यामुळे येथील नागरिकांनी तहसीलदार विनोद रणवरे यांना दूरध्वनीवरून सदर घटनेची कल्पना दिली, त्यावर त्यांच्याकडून याबाबत मंडल अधिकाऱ्यांना व तलाठ्यांना सूचना देतो असे सांगण्यात आले. परंतु दिवसभर महसूल विभागाचे कोणी या घटनेकडे फिरकले नसल्याचे समोर आले. लऊळ येथे शनिवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास अवकाळी पाऊस पडण्यास सुरुवात झाली,काही काळच या ठिकाणी पाऊस पडला,यादरम्यान वादळी वारे जोराचे सुटल्याने काही ठिकाणी नुकसानीच्या घटना घडल्या आहेत.त्यात पंढरपूर रस्त्यावरील सदरच्या दोन्ही घटना मोठ्या घडल्या.तर काही ठिकाणचे जनावरांच्या चाऱ्याच्या गंजी उडून गेल्या आहेत. कुलदीप गवळी यांच्या गाळ्यावरील पत्रे, अँगल तर पंढरपूर रस्त्यावर व त्या शेजारी असलेल्या एका हॉटेलच्या परिसरात अस्ताव्यस्त पडल्याचे दिसून आले. घटना स्थळाला ग्रामसेवक शंकर गवळी यांनी भेट देऊन पाहणी केली.

लऊळ गावचे तलाठी भोई हे माढ्याला राहत असून विभागाच्या मंडल अधिकारी गवळी ह्या बार्शीला राहत आहेत. त्यांना अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे झालेले नुकसान सांगितल्यानंतर नुकसानग्रस्त मालकांनी सांगितल्यानंतर आपण फोटो काढून ठेवा सोमवारी आल्यानंतर पंचनामा करतो असे सांगण्यात आले. त्यानंतर नुकसानग्रस्त मालकांनी तहसीलदाराना फोनद्वारे सांगितल्यानंतर मंडल अधिकारी व तलाठ्यांना सूचना देतो असे सांगण्यात आले,परंतु दिवसभर महसूल विभागाचे कोणीही फिरकले नाहीत.

## माढ्यात फळबागांचे मोठे नुकसान

माढा : माढा तालुक्यात काल शनिवार दि. ११ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास सुमारे दीड ते दोन तास वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने अचानक आलेल्या या वादळी पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली.

कुठलीही जीवित हानी झाली नसली तरी केळीसह अनेक फळबागांचे नुकसान यामध्ये झाले असून नुकसान भरपाईची आवश्यकता निर्माण झाली आहे. दरम्यान पावसाने हवेत गारवा निर्माण झाल्याने उन्हाने त्रस्त नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

काल सायंकाळी माढा तालुक्यातील माढा, सापटणे भोसे कुर्डुवाडी व परिसरासह अनेक ठिकाणी अचानक वादळी वाऱ्यासह जोराच्या अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे केळीच्या बागा काही प्रमाणात उन्मळून पडल्या. तर अनेक घरावरील दुकानावरील पत्रे उडाले.दुकानाचे बोर्ड फाटून तुटून नुकसान झाले.याचवेळी मोठमोठी झाडेही उन्मळून पडली.यामुळे माढ्यासह कुर्डुवाडी आणि परिसरातील अनेक गाव-चा वीजपुरवठा सायंकाळी तीन तासाहून अधिक आणि रात्री २ तासाहून अधिक काळ खंडित झाला होता. सापटणे भोसे



येथील एका शेतकऱ्याने दुष्काळी परिस्थितीत ऐन उन्हाळ्यात टँकरने पाणी पुरवठा करून जगवलेल्या केळींची झाडे बुडासह उनमळून पडल्याने शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.

## धाराशिव जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस

धाराशिव : धाराशिव व उमरगाच्या ग्रामीण भागाला रविवारी दुपारी दीडच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने झोडपून काढले. पाऊस सुरू असतानाच वेगवेगळ्या ठिकाणी वीज पडून एका वासरासह पाच जनावरे ठार झाली आहे. मुरूम, येणेगूर, नाईचाकूर, तुगाव, बेडगा, नागराळ, मुळज, त्रिकोळी येथे पावसाने जोरदार हजेरी लावली. शहर व तालुक्यात सकाळ पासूनच अधून मधून ढगाळ वातावरण व मोठ्या प्रमाणात उष्णता होती. तालुक्यातील मुरूम, येणेगूर, नाईचाकूर, तुगाव, बेडगा, नागराळ, मुळज, त्रिकोळीसह बहुतांश ठिकाणी दुपारी दीडच्या सुमारास वादळी वारे आणि मेघगर्जनेसह जोरदार अवकळी पाऊस झाला. यामुळे अनेकांच्या घरावरील पत्रे उडून गेली. पावसामुळे भाजीपाला, आंबा, केळी, पपई, टरबूज आदी फळबागांची मोठी हानी झाली आहे. शेतकऱ्यांनी जनावरांसाठी जमा करून ठेवलेला चारा व कडब्याच्या गंजी पावसात भिजल्याने चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.



## पशुसंवर्धन विभाग शासनाकडून झेडपीकडे वर्ग होणार

### लवकरच विलिनीकरण; दूध संस्थांच्या कारभाराचे नियंत्रण करणार

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे



माझी आत्मा तुझ्यात, तुझी आत्मा माझ्यात.. ओम फट स्वाहा..!

सोलापूर/प्रतिनिधी




शासनाचा पशुसंवर्धन विभाग आणि जिल्हा विकास अधिकारी यांचे कार्यालय आता जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे आता दूध संस्थांच्या कारभाराचे नियंत्रणही जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडूनच करण्यात येणार आहे.

संभावित नव्या निर्णयामुळे सोलापूर जिल्हा परिषदेचा आतापर्यंत दुर्लक्षित असलेल्या पशुसंवर्धन विभागाला लवकरच मोठे महत्त्व प्राप्त होणार आहे. सध्या शासन आणि जिल्हा परिषद असे दोन पशुसंवर्धन विभाग सुरू आहेत. परंतु शासनाचा विभाग आणि जिल्हा दुग्धविकास अधिकारी कार्यालय जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी घेतला आहे. त्याला मंत्रिमंडळाची मंजुरीही मिळाली आहे. फक्त शासन आदेश निघणे बाकी असल्याचे सांगण्यात आले आहे.

लोकसभा आचारसंहितेआधी असा आदेश करण्यासाठी प्रयत्न झाले आहेत. परंतु ते शक्य झाले नाही. या विभागाला स्वतंत्र सभापतीपद मिळणार असून ते मिळवण्यासाठी रस्सीखेच होणार आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर दूध संस्थांची स्थापना झाली असून गाव पातळीवरील



राजकिय व्यवस्थेला बळ देणारी संस्था म्हणून या संस्थांकडे पाहिले जाते. या आधी अनेक वेळा पशुसंवर्धन विभागाकडे शासनासह पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष असायचे. मात्र या नव्या निर्णयामुळे या विभागालाही मोठे महत्त्व येणार आहे. त्यामुळे लवकरच शासनाचा पशुसंवर्धन विभाग आणि जिल्हा दुग्धविकास अधिकारी कार्यालय जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय होईल. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता संपल्यानंतर याबाबत शासन आदेश निघणार असल्याचे सांगण्यात आले.

## सोलापूरचे तापमान ५ अंशाने घटले

### ढगाळ वातावरण, पावसाचा शिडकावा

सोलापूर : दुपारनंतर ढगाळ हवामान झाल्याने सोलापूरच्या तापमानात रविवारी तब्बल ५ अंशांनी घट झाली. शनिवारी शहराचे तापमान ४२.३ अंश होते. रविवारी त्यात घट होत तापमान ३७.४ अंश नोंदले गेले. दुपारच्या सुमारास काही भागात पावसाच्या सरी कोसळल्या.

एप्रिलच्या पंधरवड्यानंतर शहराचे तापमान ४० अशांच्या पुढेच होते. १० मे रोजी तापमान ३९ अंश झाले. ११ मे रोजी पुन्हा तापमान ४२ अशांच्या पुढे गेले. यंदाच्या उन्हाळ्यातील उच्चांकि ४४.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद ५ मे रोजी झाली होती. त्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी ६ मे रोजी सोलापूरच्या तापमानाचा पारा ४४.१ अंश सेल्सिअस झाला होता. शनिवार १२ मे रोजी तापमान ४२.४ अंश होते. रविवारी दुपारपासून ढगाळ वातावरण तयार झाल्याने आणि पावसाचा शिडकावा आल्याने सायंकाळी हवेत गारवा निर्माण झाला होता. सोलापुरात १५ मे पर्यंत अवकाळी पाऊस हजेरी लावेल किंवा या कालावधीत ढगाळ वातावरण राहील असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.